## साहित्य : **जीवनगौरव पुरस्कार । कुमार केतकर**



वृत्तपत्रमालकांचे आणि मालकशाहीचे विविध प्रकार,
पत्रकारितेतील झपाटा आणि उथळपणा, राजकारणाचे भान
आणि इतिहासाचे ज्ञान, डेडलाइन डोळ्यांसमोर ठेवून
लेखनात आणावी लागलेली शिस्त या व्यवसायातील सतत वाहणारा जिवंतपणा
(आणि तरीही एक प्रकारच्या बोथट होत जाणाऱ्या संवेदना),
टीव्ही चॅनेल्सवरील पॅनेल चर्चांमधून येणारी सनसनाटी
आणि सवंग मांडणी– आणि तरीही त्यातून अनुभवाला येणारी
उत्कट प्रासंगिकता, वर्तमानकाळाच्या हिंदोळ्यावर सतत राहून
मनाला येणारी झिंग आणि प्रत्येक अनुभवातून नवे शिकायला मिळणारी संधी...
यामुळे पत्रकारितेतील चार दशके कशी निघून गेली,
ते कळलेही नाही.

# स्वत:ला चौकटीबाहेरचा विचार करायची सवय लावली

पत्रकारितेला सुरुवात करण्याचे एक कारण- मला जगाविषयी, माणसांविषयी, राजकारणाविषयी, घटनांविषयी वाटत असलेले कुतूहल. परंतु तितकेच महत्त्वाचे दुसरे कारण होते- मला जाणवत गेलेले व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व.
महत्त्वाचे काय- व्यक्ती की समाज? व्यक्ती कोण घडवतो? त्याचे जेनेटिक स्ट्रक्चर, डीएनए की समष्टी, सामाजिक परिस्थिती?
उपजत काय असते आणि 'बाहेरून' काय घेत जातो?

स्वत:बद्दल लिहिणे किती कठीण असते! म्हणजे प्रवासवर्णन, एखादा अनुभव, नात्यासंबंध यावर काहीसे लिहिणे वेगळे आणि आत्मशोध घेणे वेगळे. मला आत्मचरित्र-चरित्रे वाचायला आवडतात; पण छोटेखानी आत्मनिवेदन करणेही जिकिरीचे वाटते. 'साधना'ने महाराष्ट्र फौउंडेशनच्या वतीने मला काही आत्मचिंतन करायला सांगितल्यापासून माझ्या मनावर चांगलाच ताण आला होता.

परंतु साधनाच्या संपादकांनी माझी अस्वस्थता पाहून म्हटले की- काहीही लिहा; प्रेरणांपासून राजकारणापर्यंत! त्यामुळे काहीसे हायसे वाटले खरे, पण तो ताण काही फारसा कमी झाला नाही. शिवाय, मला दिलेला पुरस्कार 'साहित्य जीवनगौरव' असा आहे.

मी खूप लिहिले आहे, हे खरे; पण ज्याला आपण साहित्यप्रकार म्हणतो, त्यांपैकी मी कोणताच प्रकार हाताळलेला नाही. मी (अजून तरी!) एकही कादंबरी लिहिलेली नाही, नाटक लिहिलेले नाही, कविता केलेली नाही, लघुकथा व दीर्घकथाही लिहिलेली नाही. त्यामुळे 'साहित्य जीवनगौरव' हा पुरस्कार स्वीकारणे तसे संकोचाचेच.

पत्रकार या नात्याने मी इंग्रजीत व मराठीत खूप लेखन केले आहे. द इलस्ट्रेटेड वीकली, इम्प्रिन्टपासून ते अगदी इंडिया टुडे, आऊटलूक या नियतकालिकांपर्यंत अनेक ठिकाणी आणि द इकॉनॉमिक टाइम्स, द ऑब्झर्व्हर, द टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी दैनिकांमध्ये. त्याचप्रमाणे महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, लोकसत्ता आणि दिव्य मराठी या दैनिकांमध्ये संपादक या नात्याने लिहिलेल्या अग्रलेख-लेखांची संख्या पाच-सात हजारही असेल.

अर्थातच, त्या लेखनापैकी 'साहित्य' या सदरात मोडणारे काहीच नाही. कदाचित पत्रकारिता हाही एक साहित्यप्रकार मानून महाराष्ट्र फाउंडेशनने हा पुरस्कार दिला असावा. (नाही तरी हल्ली पत्रकारिता आणि कल्पनाविलास वा फिक्शन यात फारसे अंतर राहिलेले नाही!) खरे म्हणजे, मी पत्रकारिता हे क्षेत्र निवडले ते 'करिअर' म्हणून नव्हे. शालांत परीक्षेनंतर रेडिओ सर्व्हिसिंग/इंजिनिअरिंगचा एक कोर्स केल्यानंतर मला आयआयटी पवईसारख्या प्रतिष्ठाप्राप्त संस्थेमध्ये प्रथम इलेक्ट्रॉनिक्स आणि नंतर कॉम्प्युटर डिपार्टमेंटमध्ये नोकरी मिळाली होती. आयआयटीतच राहिलो असतो, तर आठ-दहा वर्षांपूर्वी कुठच्या तरी सिनिअर टेक्निकल पोस्टवरून निवृत्त झालो असतो. परंतु आयआयटीत असतानाच मॉर्निंग कॉलेज करून पदवी आणि नंतर

पदव्युत्तर प्रबंधासाठी 'मास मीडिया इन इंडिया/थर्ड वर्ल्ड' असा विषय मी निवडला होता.

साधारणपणे १९६८-६९ च्या सुमाराला माझे शिक्षक भाऊ फाटक (लाल निशाण पक्षाचे; एसटी कामगारनेते नव्हेत.) मला काही निमित्ताने आचार्य अत्रे यांच्याकडे घेऊन गेले होते. अत्रे यांना भेटणे हाच एक अप्रूपता असलेला अनुभव होता. त्यांचा दबदबा, दरारा आणि हल्लीच्या भाषेत त्यांची 'दबंग'गिरी यांच्या प्रभावाने कुणीही हतप्रभ झाले असते. भाऊंनी माझी एक विद्यार्थी (खरे म्हणजे, मी तेव्हा आयआयटीत नोकरी करीत होतो- पण विद्यार्थीही होतोच!) म्हणून ओळख करून दिली. अत्रे यांनी लगेचच माझ्याशी बोलायला सुरुवात केली. 'काही लिहिता की नाही?' मला उद्देशून केलेला हा 'अहो' असा उल्लेखच अंगावर काटे आणणारा होता. त्यांनी लगेचच मला 'मराठा'च्या रविवार आवृत्तीसाठी लिहायला सांगितले. माझा मराठी पत्रकारितेशी संबंध आला तो असा थेट अत्र्यांमुळे!

वाचनाची आवड आणि सवय लागण्याचे एक कारण माझी आई. ती काही पदवीधर वगैरे नव्हती. विद्यापीठीय शिक्षण तर फारच दूर. पण तिचे वाचन विलक्षण होते. केवळ कथा-कादंबऱ्या नव्हे; तर प्रवासवर्णने, लेख, चरित्र-आत्मचरित्रे. आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यापासून वि. स. खांडेकर ते अगदी गंगाधर गाडगीळ यांच्यापर्यंत. पुस्तकातले आवडलेले भाग ती स्वत:च्या वहीत लिहून काढत असे. कोणत्या पुस्तकातले काय विशेष आहे, याची नोंदही ती ठेवत असे. वाचलेल्या गोष्टीची/लेखाची ती उत्तम समीक्षाही करीत असे- प्राध्यापकी शैलीतली नव्हे, तर सुजाण वाचकाच्या दृष्टिकोनातून.

आमच्या चेंबूर हायस्कूलचे मैदान व काही इमारतीचा भागही विद्यार्थी-शिक्षकांच्या श्रमदानातून झाला होता आणि ग्रंथालयाची मांडणी-नियोजनही आम्हीच काही जण करीत असू. या सर्व उपक्रमांचे मुख्य सूत्रसंचालक भाऊ फाटक असत. ग्रंथालयातील पुस्तकांची मांडणी करता-करता भाऊंची गप्पात्मक बौद्धिकेही होत असत. त्या गप्पांमध्ये गांधीजी, पंडित नेहरू, स्वातंत्र्य चळवळ ते कामगार चळवळ असे सर्व विषय असत. लोकमान्य टिळक ते कॉम्रेड डांगे आणि महात्मा फुले ते डॉ. आंबेडकर यांच्या चरित्राची व विचारांची ओळखही भाऊंच्या अशा अनौपचारिक बौद्धिकांमधूनच झाली. वाचनाला वळण लागले ते त्याच काळात. पण पुढे वाचनाच्या कक्षा रुंदावल्या त्या आयआयटीत गेल्यावर. बर्ट्रांड रसेल ते आइन्स्टाईन, मार्क्स ते फ्रॉईड, लेनिन, स्टालिन ते हिटलर असे तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र विषय डोक्यात भिनू लागले.

या सर्व वाचनाचा हेतू काय होता? तर आपले जग, माणसे, त्यांचे स्वभाव, राजकारण, साहित्य-कला, इतिहास असे सर्व काही आपल्याला समजायला हवे. आयआयटीमध्ये असल्यामुळे आणि रसेल व पंडित नेहरूंच्या प्रभावामुळे त्या कुतूहलाला विज्ञानाची जोड मिळाली. तरीही एक मूलभूत प्रश्न सतावत होताच. आपल्या बाजूला इतकी माणसं- जगभर कोट्यवधी माणसं- त्यांचे इतके स्वभाव, इतके कलह, इतकी नाती आणि इतक्या संस्कृती... या सर्वांमागच्या प्रेरणा काय आहेत? इतके फरक का आहेत? इतके तत्त्वज्ञ, इतके संत, इतके धर्म, वेदांपासून पाश्चिमात्य तत्त्वज्ञानापर्यंत इतके चिंतन; मग माणसांचे असंख्य प्रश्न अजून अनुत्तरित का? केवळ मार्क्स, फक्त फ्रॉईड, फक्त समाजशास्त्र वा अर्थशास्त्र यांत उत्तरे सापडतीलच असे नाही.

त्या कुतूहलापोटी आणि अस्वस्थतेपोटी जेव्हा कुणी तरी सुचवले की, जे. कृष्णमूर्तींची व्याख्याने ऐकायला हवीत; तेव्हा जे जे स्कूल ऑफ आर्ट्सच्या आवारात कृष्णमूर्तींचे व्याख्यान ऐकायला १९६७ मध्ये प्रथम मी गेलो. कोणत्याच थिअरीत वा अध्यात्मात- पोथीबद्ध उत्तरे मिळणार नाहीत आणि कोणत्याही वैचारिक चौकटीबाहेर जाऊन विचार करायला हवा- या ढोबळ स्वरूपात सांगता येईल, अशा त्यांच्या सूत्राच्या आधारे मी स्वत:ला चौकटीबाहेरचा विचार करायची सवय लावली. परंतु तरीही कार्ल मार्क्स आणि सिग्मंड फ्रॉईड यांचा माझ्यावर खूपच खोल प्रभाव झाला; जसा पुढे डार्विन आणि मार्शल मॅक्लुहानचा होत गेला. अशा प्रभावाखाली वा अशा चौकटीत विचार करणे कृष्णमूर्तींच्या विचारशैलीत बसत नव्हते; पण मला त्या परस्परविरोधी विचारसरणींचा जाच कधीही जाणवला नाही. किंबहुना, त्यामुळे माझा वैचारिक प्रवास आणि वाचनप्रवास अधिक मुक्त होत गेला.

त्या प्रवासाबरोबर सुरू झाला प्रत्यक्ष प्रवास. आयआयटी सोडून इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास

कम्युनिकेशन व प्रेस इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या दिल्लीस्थित संस्थांमध्ये रिसर्च असिस्टंट म्हणून नोकरी सुरू केली आणि 'मीडिया' नावाच्या सळसळत्या, सतत खळाळणाऱ्या (उथळ पाण्याला खळखळाट फार, हेही पुढे लक्षात येऊ लागले!) क्षेत्रात येऊन थडकलो.

पत्रकारितेला सुरुवात करण्याचे एक कारण- मला जगाविषयी, माणसांविषयी, राजकारणाविषयी, घटनांविषयी वाटत असलेले कुतूहल. परंतु तितकेच महत्त्वाचे दुसरे कारण होते- मला जाणवत गेलेले व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व. महत्त्वाचे काय- व्यक्ती की समाज? व्यक्ती कोण घडवतो? त्याचे जेनेटिक स्ट्रक्चर, डीएनए की समष्टी, सामाजिक परिस्थिती? उपजत काय असते आणि 'बाहेरून' काय घेत जातो? मानसशास्त्रात या मुद्द्यावर गेल्या शतकात प्रचंड वाद झाले आहेत. मला असे वाटले की वृत्तपत्र हे एक माध्यम कुतूहलाबरोबरच त्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आविष्कारही करण्याची संधी देऊ शकेल. माझी लोकशाहीवरची 'श्रद्धा' ही त्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेतून आली आहे.

स्वातंत्र्य आणि स्वैराचार, बंड आणि क्रांती, आक्रोश आणि आक्रंदन, आंदोलन आणि अराजक या संकल्पनांमधल्या सीमारेषा अनेकदा पुसट असतात. उस्फूर्त आंदोलन अराजकाच्या वळणावर केव्हा जाऊन थडकते, हे त्या आंदोलनाच्या नेत्यांना वा अनुयायांनाही अनेकदा कळत नाही. तीच गोष्ट स्वातंत्र्य आणि स्वैराचाराबद्दल. या पुसट सीमारेषा दूर करून त्यात स्पष्टता आणणे, हे फक्त तात्त्विक आव्हान नाही तर ती व्यावहारिक गरज आहे. आज आपण इतक्या विलक्षण अनिश्चिततेच्या वातावरणात आणि इतक्या कमालीच्या वेगाने झपाटलेल्या जगात राहात आहोत की, हे शतक माणसाला अधिक उज्ज्वल आणि उन्नत करील की हे सिव्हिलायझेशनच उद्ध्वस्त करील, हेही सांगता येणार नाही. म्हणूनच ते अधिक सुंदर आणि समृद्ध करण्याचा आपला प्रयत्न असावा. तो करतानाच संघर्ष करावा लागतो आणि तेच मोठे आव्हान आहे.

आता हां-हां म्हणता पत्रकारितेत ४३ वर्षे होऊन गेली आहेत. सुरुवात जरी 'मराठा'तल्या लेखाने झाली असली, तरी पुढे जवळजवळ २५ वर्षे इंग्रजी पत्रकारितेत व्यतीत केली आहेत आणि १९९३ पासून महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, लोकसत्ता आणि आता दिव्य मराठी या मराठी दैनिकांत संपादक म्हणून! वृत्तपत्रमालकांचे आणि मालकशाहीचे विविध प्रकार, पत्रकारितेतील झपाटा आणि उथळपणा, राजकारणाचे भान आणि इतिहासाचे ज्ञान, डेडलाइन डोळ्यांसमोर ठेवून लेखनात आणावी लागलेली शिस्त या व्यवसायातील सतत वाहणारा जिवंतपणा (आणि तरीही एक प्रकारच्या बोथट होत जाणाऱ्या संवेदना), टीव्ही चॅनेल्सवरील पॅनेल चर्चांमधून येणारी सनसनाटी आणि सवंग मांडणी- आणि तरीही त्यातून अनुभवाला येणारी उत्कट प्रासंगिकता, वर्तमानकाळाच्या हिंदोळ्यावर सतत राहून मनाला येणारी झिंग आणि प्रत्येक अनुभवातून नवे शिकायला मिळणारी संधी... यामुळे पत्रकारितेतील चार दशके कशी निघून गेली, ते कळलेही नाही.

माझी आई पत्रकार नव्हती, तिच्या काळात तर ती शक्यताही नव्हती. पण तिच्या वाचनसंस्कृतीचा आणि वाचनशिस्तीचा संस्कार झाला नसता, तर कदाचित मी पत्रकार ऊर्फ 'लेखक' झालोही नसतो. माझ्या दोन्ही बहिणीसुद्धा आईच्या त्याच मुशीत वाढल्या आणि उत्तम वाचक व लेखकही झाल्या. लौकिक अर्थाने त्या प्रसिद्ध किंवा 'ज्ञात' नसतीलही; पण त्यांच्यातील कमालीची नि:स्पृहता, उत्कटता, नितळ शैली हीसुद्धा आईच्याच 'जीन्स'मधून आली असणार!

त्याचप्रमाणे शारदा जर माझ्या या प्रवासात भेटली नसती, तर मी कुठेही भरकटत जाऊ शकलो असतो. 'मैं तो चला जिधर चले रस्ता' म्हणत आणि आत्मगुंजनात अडकून गेलो असतो. खरे म्हणजे, मग मी आयआयटीत असतो वा पत्रकार असतो, तरी त्या 'असण्याला' अर्थ वा आशयच मिळाला नसता. शारदाने तर कधीच 'करिअर' वा नोकरीची, पैसे मिळवण्याची वा ऐहिक जीवनशैलीची आस धरलेली नाही. माझ्या लेखनावर वा पत्रकारितेवरच नव्हे, तर जगण्यावरच तिचे अदृश्य वलय आहे. किंबहुना, त्यामुळेच हा जीवनगौरव पुरस्कार आईलाही आहे आणि शारदालाही!

**कुमार केतकर**
ketkarkumar@gmail.com
Mob.: 9821524131

## साहित्य : **वैचारिक ग्रंथ पुरस्कार । डाकीण : संध्या नरे–पवार**



स्त्रियांच्या बाबतीत– किंबहुना, शोषित गटातल्या कोणत्याही घटकाच्या बाबतीत– प्रत्येक वेळी डोळे जे दाखवतील आणि कारण जे सांगतील, त्यावर विश्वास ठेवता येत नाही. ज्यांचं संपूर्ण अस्तित्व वेगवेगळ्या सत्तांच्या पहाऱ्यात बंदिस्त असतं; त्यांच्यासमोर जाताना डोळे जे दाखवतील आणि कान जे सांगतील त्याला हजार प्रश्न विचारले नाहीत, तर संशोधनपर समाजशास्त्रीय लेखन करता येणार नाही. स्त्रीजीवनाच्या संदर्भातली कोणतीही प्रथा– मग ती सती प्रथा असो, का हुंडा प्रथा असो– ती केवळ प्रथा असत नाही, केवळ अंधश्रद्धा असत नाही; तर स्त्रीच्या दुय्यमत्वाचा सारा इतिहास त्यात गाडलेला, चिणलेल असतो. म्हणूनच प्रश्नांची पहार घेऊन उत्खनन करणं आवश्यक असतं.

# प्रश्नांची पहार घेऊन उत्खनन करणं आवश्यक

जातव्यवस्था आणि स्त्रियांचं समाजातील स्थान हे माझे अभ्यासाचे विषय आहेत. सुरुवातीपासून मला या दोन विषयांबाबतच अधिकाधिक प्रश्न कळत होते. उत्तरांसाठी कधी पुस्तकांचा, कधी पत्रकारितेचा, पत्रकारितेच्या निमित्ताने महाराष्ट्रातल्या गावामधनं केलेल्या भटकंतीचा आधार घेतला. यातनं मग मला गवसलेल्या सत्याची मांडणी स्वत: करत गेले.

पत्रकारिता, पत्रकारितेतलं लेखन आपल्या साहित्यिक निकषांमध्ये कायम 'उपरं' मानण्यात आलं आहे. रोजच्या रोज लेखणी झिजवूनही पत्रकार 'लेखक' नसतो. स्वत:ची आंतरिक गरज म्हणून लिहिलेल्या कविता तुम्हाला कविपणाच्या वाटेवर नेतातच, असं नाही. तेच कथांच्या बाबतीत. लिहिलेल्या कथांपैकी एखाद दुसरी कथा दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झाली म्हणून तुम्ही 'कथाकार' बनत नाही. एखादं माध्यम जोवर तुमच्या अभिव्यक्तीची निकड बनत नाही, तोवर त्या माध्यमातनं प्रसवलेले शब्द हा हौसेचाच मामला असतो.

या अशा स्थितीत लेखणी लिहिती असूनही मी लेखक केव्हा बनले? तर, 'डाकीण – एक अमानवी प्रथा' आणि 'तिची भाकरी कोणी चोरली? – दलित बहुजन स्त्रीच्या वर्तमानाचा शोध' ही दोन पुस्तकं प्रसिद्ध झाल्यावर. गंमत म्हणजे डाकीणची सुरुवात २००३ मधली, तर तिची भाकरीची सुरुवात २००८ मधली; पण ही दोन्ही पुस्तकं एकाच वर्षी प्रसिद्ध झाली – २०१२ मध्ये. काही महिन्यांच्या अंतराने. एक मार्चमध्ये, दुसरे जुलैमध्ये. आज लेखक म्हणून माझी संपदा ही अवघ्या दोन पुस्तकांची आहे. जगाच्या दृष्टीने २०१२ मध्ये मी लेखक बनले. हे लेखकपणही 'साहित्यिक' या शब्दाची झूल पांघरलेलं नाही, तर रोखठोकपणे 'वैचारिक'– 'समाजशास्त्रीय' या गटात मोडणारं आहे. म्हणजे प्रतिभा, ऊर्मी हे शब्द तसे कोसों दूरच राहतात. या अशा स्थितीत माझ्या लेखकपणाविषयी, लेखनप्रवासाविषयी मी नेमकं काय सांगावं, याविषयी गोंधळ आहे.

म्हणजे– एखाद्या व्यक्तीची माणूस म्हणून असणारी जडण–घडण कशी झाली आहे, माणूस म्हणून– एक विचार करणारं माणूस म्हणून– घडताना तिची/त्याची वैचारिक मुळं सभोवताली कुठे आणि कशी रुजली आहेत, त्यांचा विस्तार कसा झाला आहे, तिचं/त्याचं भौगोलिक, सामाजिक पर्यावरण काय आहे... या प्रश्नांच्या उत्तरांच्या मातीतनं त्या व्यक्तीचं लेखकपण, त्याच्या लेखनाची जातकुळी अंकुरत असते. म्हणूनच हे सगळं वजा करून केवळ त्या व्यक्तीच्या लिहित्या हाताविषयी लिहिणं हा शब्दांचा खेळ असेल; आणि हे सगळं लिहायचं म्हणजे आत्मचरित्रच लिहायला हवं.

माझ्या मुलीने– सईने– ती इयत्ता चौथीत असताना वयाच्या दहाव्या वर्षी 'माझी आई' या विषयावर निबंध लिहिला होता. त्यात ती लिहिले, 'माझी आई किचनमध्ये फार कमी वेळ असते. ती सारखं लिहीत–वाचत असते. तिला दुसरं काही करता येत नाही.' शिक्षकांच्या मते,

माझ्या मुलीने माझ्या आईपणाचा पंचनामा केला होता. किचनमध्ये फार न शिरणारी बाई चांगली आई कशी असेल? पण माझ्या लेखी हा निबंध म्हणजे प्रशस्तिपत्रकच आहे. माझ्या लेकराने मला ओळखल्याची ती खूण आहे. मला खरंच लेखन-वाचनाखेरीच दुसरं काही करता येत नाही. बाईपणाच्या वाट्याला आलेल्या अपरिहार्य गोष्टी म्हणून किचनमधल्या उलाढालींपासून बाजारहाटापर्यंत अनंत गोष्टी कराव्या लागत असल्या, तरी माझा जीव लेखन-वाचनाखेरीज आणखी कशात रमत नाही. माझा पोटा-पाण्याचा उद्योगही गेली चोवीस वर्षं पत्रकारिता म्हणजे लेखन हाच आहे. लेखन-वाचन हा माझ्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग आहे. त्याखेरीज मी 'मी' झाले नसते. बालपण वस्तीपातळीवर कष्टकरी वर्गात गेले. आजचं जगणं मध्यमवर्गीय आहे. जगण्याचा स्तर बदलला तरी पुस्तकांची सोबत सुटली नाही. मला आठवतंय तेव्हापासून माझ्या हातात पुस्तक आहेच. स्वत: सातवी शिकलेल्या आमच्या आईने आपल्या मुलांनी भरपूर शिकावं हे स्वप्न पाहिलं आणि आमच्या हातात शालेय पुस्तकांबरोबरच इतर पुस्तकंही ठेवली. वडील समाजवादी चळवळीतील कार्यकर्ते होते. एस. एम. जोशींपासून ते भाऊ पाध्येंपर्यंत आणि दया पवारांपासून ते लोहियांपर्यंत वेगवेगळ्या लेखकांची पुस्तकं घरी 'विकत' आणली जायची. मी नोकरीला लागेपर्यंत 'रुमाल' विकत घेतलेला नव्हता. आई शिवणकाम करताना उरलेल्या कापडातून रुमाल शिवून द्यायची. शालेय वयात चॉकलेट खायचं असेल तर शाळेत बसने न जाता चालत जायचं आणि आईने बससाठी दिलेले पाच-दहा पैसे साठवून मग खाऊ खाण्याची चैन करायची- अशी स्थिती होती. हे उल्लेख एवढ्यासाठीच की- अशा आर्थिक ओढघस्तीच्या स्थितीतही 'कामगार' असलेले, अशिक्षित शेतकऱ्याच्या दहावी पास मुलगा असलेले वडील पुस्तकं 'विकत' आणत होते. आज माझं घर पुस्तकांनी भरलं आहे, घराच्या प्रत्येक कोपऱ्यात पुस्तकं आहेत.

माझ्या वाचनाने माझ्यातल्या लेखकाला, पत्रकाराला घडवलंय. वाचन ही माझी गरज बनली होती, निकड बनली होती. कारण जसजशी समज येत होती, वय वाढत होतं; तसतशी माझ्या मनात असंख्य प्रश्नांची पेवं फुटत होती. बालपणी वस्तीपातळीवरच्या जगण्यात मुसलमान, ख्रिश्चन धर्मीय शेजारी होते. कसलीच वेगळेपणाची जाणीव नव्हती. कारण सगळ्या कुटुंबाशी सलोख्याचे, जिव्हाळ्याचे संबंध होते. सगळ्या घरांतली मुलं सगळ्या घरांमध्ये खेळत होती. पण मध्येच कधी तरी काही तरी खुट्ट व्हायचं आणि हातात तलवारी, सुरे घेऊन हिंदू-मुसलमान एकमेकांसमोर उभे राहायचे. पलीकडच्या चाळीत दंगा सुरू आहे, हे शब्द वयाच्या दहाव्या-बाराव्या वर्षी कानावर पडत असत. का? कशासाठी? -या प्रश्नांची धड उत्तरं मिळत नसत. याच काळात मी कधीतरी आसमंतात 'शिवसेना' हा शब्द ऐकला. आणखी एक शब्द सतत कानावर येई. 'ते'! 'दलित'! हिंदू-मुसलमान-ख्रिश्चन अशा मिश्र वस्तीत आम्ही राहत होतो, पण या अशा मिश्र वस्तीतही दलितांच्या चाळी वेगळ्याच होत्या. त्या मिश्र वस्तीत एकही ब्राह्मण किंवा उच्चवर्णीय कुटुंब नव्हतं. पण तरी मधल्या, मागास जातींचे हिंदू तेव्हा दलितांचा उल्लेख 'आंबेडकरवाले' असा करत. आपल्या मुलांना त्या भागात पाठवत नसत. मी मात्र सगळा भाग कधी एकटीने, तर कधी वडिलांबरोबर पालथा घातला होता.

वयाच्या सोळाव्या वर्षी खार-जवाहरनगर सुटलं आणि आम्ही पार्ल्याच्या उच्चभ्रू वस्तीत रहायला आलो. अनेक बहुजन महिलांप्रमाणे 'आपल्या मुलांनी चांगल्या वस्तीत राहावं', हे माझ्या आईचं स्वप्न होतं; ते पूर्ण झालं. पण माझ्यासाठी ही वस्ती अधिक भयानक होती, अंगावर येणारी होती. इथल्या उच्चवर्णीयांचे जातश्रेष्ठत्वाचे फूत्कार अधिक तीव्र होते. समोरच्याला आक्रसणारे, न्यूनगंड देणारे होते. कितीही स्पष्ट आवाजात 'नरे' असं सांगितलं तरी 'खरे का?' असा प्रश्न येई. इथलं सगळं जगणं आडनावात बांधलेलं होतं, या आडनावात लपलेल्या जात- ओळखीत बंदिस्त होतं.

एरवी ज्या दोन जगांची तोंडओळख होणंही दुरापास्त, अशी दोन जगं मला माझ्या भौगोलिक पर्यावरणाने दाखवली. तीही घटत्या वयात. कळत-नकळत त्याचा जरा खोलवर परिणाम माझ्या समग्र अस्तित्वावर झाला. एखादं जग मग ते खार-जवाहरनगरमधलं असो, पार्ल्यातलं असो किंवा लग्नानंतर ओळखीचं झालेलं गिरगाव असो; ते जसं असतं तसं असण्याची पाळमुळं एकूण समाजव्यवस्थेत रुजलेली असतात. म्हणजे समजाव्यवस्था जर जात-वर्ण-वर्गवर्चस्ववादावर आधारलेली असेल तर त्यात पार्ल्यासारखं बंदिस्त जग आणि त्यातला श्रेष्ठत्वाचा अहंकार जन्माला येणार; वर्गीय

शोषणातनंच जवाहरनगरसारखी हातवर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांची वस्ती चारी बाजूंनी पसरत जाणार. डाव्या विचारसरणीच्या पुस्तकांनी, फुले-आंबेडकरांच्या लेखनाने हे भान दिलं.

या सगळ्यामुळेच वयाच्या विसाव्या वर्षी पत्रकारितेत आल्यावर राजकीय पत्रकारिता करण्याची संधी असतानाही मी कायम सामाजिक विषयांवरच आधी बातमीदारी आणि नंतर लेखन करत राहिले. माझ्या पत्रकारितेने मला समजाचं विरूप अधिकाधिक दाखवलं; किंबहुना, पत्रकारितेच्या माध्यमातनं मी समाजातल्या या विरूपापर्यंत अधिकाधिक पोहोचण्याचा, त्याला अधिकाधिक प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. जातव्यवस्था आणि स्त्रियांचं समाजातील स्थान हे माझे अभ्यासाचे विषय आहेत. सुरुवातीपासून मला या दोन विषयांबाबतच अधिकाधिक प्रश्न कळत होते. उत्तरांसाठी कधी पुस्तकांचा, कधी पत्रकारितेचा, पत्रकारितेच्या निमित्ताने महाराष्ट्रातल्या गावामधनं केलेल्या भटकंतीचा आधार घेतला. यातनं मग मला गवसलेल्या सत्याची मांडणी स्वत: करत गेले.

मला वाटतं कुठल्याही लेखकासाठी, अभ्यासकासाठी प्रश्नांची वाट महत्त्वाची असते. तुम्हाला कोणते प्रश्न पडतात, कोणते प्रश्न छळत राहातात यावर मिळणारी उत्तरं अवलंबून असतात. वर्तमानात जे वास्तव समोर दिसतंय, इतिहासात ज्या घटना सांगितल्या जातात; त्यांना उभा-आडवा छेद देण्याचं काम प्रश्न करतात. स्त्रियांच्या बाबतीत- किंबहुना, शोषित गटातल्या कोणत्याही घटकाच्या बाबतीत- प्रत्येक वेळी डोळे जे दाखवतील आणि कारण जे सांगतील, त्यावर विश्वास ठेवता येत नाही. ज्यांचं संपूर्ण अस्तित्व वेगवेगळ्या सत्तांच्या पहाऱ्यात बंदिस्त असतं; त्यांच्यासमोर जाताना डोळे जे दाखवतील आणि कान जे सांगतील त्याला हजार प्रश्न विचारले नाहीत, तर संशोधनपर समाजशास्त्रीय लेखन करता येणार नाही. स्त्रीजीवनाच्या संदर्भातली कोणतीही प्रथा- मग ती सती प्रथा असो, का हुंडा प्रथा असो- ती केवळ प्रथा असत नाही, केवळ अंधश्रद्धा असत नाही; तर स्त्रीच्या दुय्यमत्वाचा सारा इतिहास त्यात गाडलेला, चिणलेल असतो. म्हणूनच प्रश्नांची पहार घेऊन उत्खनन करणं आवश्यक असतं.

अनेकदा मनात केवळ प्रश्न असतात; त्यांची उत्तरं सापडतच नाहीत. अशा वेळेला न थकता, न कंटाळता अभ्यास सुरू ठेवावा लागतो. संबंधित विषयांवरची पुस्तकं आणून वाचावी लागतात. त्यांच्या नोट्स काढाव्या लागतात, स्वत:चं गृहीतक मांडावं लागतं, सभोवतालत्या वास्तवातून पुरावे गोळा करावे लागतात. त्यासाठी कार्यक्षेत्राची उभी-आडवी भटकंती करावी लागते, लोकांशी बोलावं लागतं, मुलाखती घ्याव्या लागतात, त्यांच्या नोट्स काढाव्या लागतात, कधी तुमच्या गृहीतकाचीच नव्याने मांडणी करावी लागते, पुन्हा पहिल्यापासून कामाला सुरुवात करावी लागते... आणि एवढं सगळं झाल्यावर तुम्हाला जे म्हणायचंय, ते सांगण्यासाठी लेखनाला सुरुवात करावी लागते. प्रत्यक्ष लिहितानाही गुंते अनेक असतात. केवळ कथा-कविता लिहितानाच लेखक एखाद्या अचूक शब्दासाठी अडून बसतो असं नाही; तर वैचारिक लेखन करतानाही एखाद्या अचूक विधानासाठी, एखाद्या अचूक प्रतिवादासाठी तुम्ही दिवसेंदिवस जिथल्या तिथे अडकून राहता. हा काळ मोठा कठीण असतो. आत्मपरीक्षेचा असतो. माझ्या दोन्ही पुस्तकांच्या वेळेला असा परीक्षेचा काळ अनेकदा आला. पण मला मुळातच अभ्यासाची आवड असल्याने आपल्या विधानासाठी अधिकाधिक पुरावे गोळा करणं, गृहीतकाची नव्याने तपासणी करणं- हे मी आनंदाने केलं.

माझ्या दोन्ही पुस्तकांची लेखनप्रक्रिया ही सर्वसाधारणपणे अशी आहे. त्यात भटकंतीला, लोकांना प्रत्यक्ष भेटण्याला जितकं महत्त्व आहे; तितकंच महत्त्व महिनोन्महिने कागद-पेनाशी स्वत:ला बांधून घेत विषयाशी झुंजण्याला आहे. यासाठी तुमच्या इतर सगळ्या आवडी-निवडी, इतर व्यवधानं (अपवाद नोकरी आणि घरकाम) बाजूला ठेवून केवळ तुमच्या अभ्यासविषयासोबत असावं लागतं; त्या विषयासोबतच जगावं लागतं. प्रसंगी हे सगळं खूप थकवणारं असतं. तुम्हाला सतत अस्वस्थ ठेवणारं असतं. इतर लेखनाचं मला माहीत नाही; पण वैचारिक लेखन तुमच्याकडे स्वास्थ्याची मागणी करतं. शारीरिक, मानसिक- दोन्ही.

अस्वस्थता, अशांतता, अस्वास्थ्य यांच्या वाटेवरच संशोधनावर आधारित लेखनाची गढी असते. ज्याने-त्याने आपल्या जबाबदारीवर या गढीत शिरावं.

**संध्या नरे-पवार**
Mob.: 9322244507

ओळख
संध्या नरे-पवार

# वाचून चिंतन करण्यासारखे पुस्तक

## वंदना सोनाळकर

संध्या नरे-पवार या व्यवसायाने पत्रकार आहेत. त्यांनी आदिवासी समाजातील 'डाकीण' प्रथेवर पुस्तक लिहिताना त्यांच्यातील उत्तम पत्रकाराचे गुण पुरेपूर वापरले आहेत, हे प्रथम सांगायला हवेच. मात्र, या लेखिका महाराष्ट्रातील नंदुरबार व ठाणे जिल्ह्यात आज अस्तित्वात असलेल्या डाकीण प्रथेचा मागोवा घेत-घेत, या पलीकडे जाऊन, आपल्या समाजात स्त्रियांकडे बघण्याची दृष्टी आणि त्यांच्याशी केले जाणारे वर्तन यासंबंधीच्या मूलगामी प्रश्नांना हात घालतात. या पुस्तकाचे यशापयश तपासताना आपल्याला त्याच्या या दोन्ही बाजू बघितल्या पाहिजेत.

पुस्तकाचा सुरुवातीला डाकीण प्रथेकडे स्त्रियांवर होणाऱ्या हिंसेचे एक उदाहरण म्हणून पाहिले जाते. केलीबाई पटले या आदिवासी स्त्रीला डाकीण ठरवून २००३ मध्ये ठार मारण्यात आले, ही बातमी मराठी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली. डिसेंबर २००३ मध्ये महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन समितीने नंदुरबार शहरात 'डाकीण प्रथाविरोधी प्रबोधन शिबिर' आयोजित केले. नरे-पवार यांचे पुस्तक २०१२ मध्ये प्रकाशित झाले आणि २०१३ या वर्षात स्त्रियांवरील हिंसा हा विषयक बहुचर्चित ठरला. दिल्लीत एका तरुणीवर २०१२ च्या शेवटच्या महिन्यात झालेला सामूहिक बलात्कार आणि त्यानंतर झालेला तिचा मृत्यू हे या चर्चेला प्रामुख्याने कारणीभूत होते. यामध्ये लैंगिक हिंसेवर अधिक भर दिला जात असला; तरी भारतीय समाजात स्त्रियांवर, स्वतःच्या घरापासून ते सार्वजनिक स्थळापर्यंत किती सहजपणे हिंसा केली जाते, हे सर्वांसाठी अधोरेखित केले गेले. तरी प्रसार माध्यमांत होणारी चर्चा ही स्वाभाविकतः मर्यादित असते, वरवरची असते. त्यामुळे एका विशिष्ट समाजातील स्त्रियांवर हिंसा करणारी एक प्रथा हा विषय घेऊन सखोल विश्लेषण करणारे हे पुस्तक आजच्या वाचकांना बरेच उपयुक्त ठरू शकेल आणि या प्रश्नावरील लोकांच्या चिंतनाला दिशा देऊ शकेल.

पहिल्याच प्रकरणात नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यात रस्त्याने नरे-पवार या प्रवास करत असताना आदिवासी समाजाबद्दल नागर लोकांच्या मनात असलेल्या काही सामान्य धारणांचा उल्लेख करतात. आदिवासींचे जगणे गरिबीचे असेल, त्यांच्याकडे वस्तू कमी असतील; पण ते निसर्गाच्या सान्निध्यात राहतात. निसर्गाशी त्यांचे जैविक नाते असते. आदिवासी समाजात स्त्री-पुरुष दोघेही कष्ट करतात आणि मुळातच त्यांच्यामध्ये मालमत्तेच्या प्रश्नांना फार महत्त्व असते. स्त्रिया आपला जोडीदार स्वतः निवडू शकतात. बाकी समाजापेक्षा स्त्री-पुरुषांमध्ये अधिक मोकळीक असते. या पूर्वग्रहांच्या पार्श्वभूमीवर काही स्त्रियांना डाकीण ठरवून- येथील वाक्प्रचार आहे 'डाकीण काढणे'- तिला मारून टाकण्याचा प्रकार फारच धक्कादायक वाटतो. आदिवासींचे जमीनदारांकडून, अधिकाऱ्यांकडून शोषण होते, हेही आपल्याला माहीत असते. मात्र, आदिवासी समाजाच्या अंतर्गत होणारी ही स्त्रीविरोधी हिंसा कशी काय घडते? ठीक आहे, ती एका 'मागास' जमातीच्या 'अंधश्रद्धेतून' घडणारी गोष्ट असेल; तर पोलिसांकडून ती बंद का केली जात नाही? नरे-पवार एक पत्रकार म्हणून केलीबाईच्या मृत्यूचा शोध घेत धडगावला येतात, तेव्हा हेच प्रश्न त्यांच्या मनात असतात.

केलीबाईच्या हत्येविषयी वाचा फोडली, ती एका शाळकरी मुलीने. नंतर काही दिवस तरी मराठी वर्तमानपत्रांचे वाचक जागे झाले होते. नंदुरबारच्या आदिवासी-भिल्ल समाजात खळबळ उडाली होती. नंतर एक प्रकारचे मौन पसरले. 'इथे असे काही घडलेच नाही, घडत नाही'... स्त्रियांवर होणारी हिंसा ही समाजातली एक रूढ गोष्ट आहे. तिच्यावर प्रसारमाध्यमांच्या आणि कायद्याच्या भाषेत प्रसिद्धीचा प्रकाश पडला की, सत्य नाकारण्याची प्रतिक्रिया आपण अनेक प्रसंगी पाहिली आहे. खैरलांजीतील दलित महिलांची अघोरी हत्या हे त्याचे मोठे उदाहरण आहे. त्यामुळे या पुस्तकातील एक

प्रकरणाचे शीर्षक 'मौन आणि व्यवस्था' असे आहे. डाकीण काढलेल्या स्त्रियांना शोधून, त्यांच्याशी संवाद साधणे हे काही सोपे काम नव्हते. तरीही लेखिकेने 'मी डाकीण नाही' या प्रकरणात १४-१५ स्त्रियांच्या मुलाखती घेऊन त्यांचे म्हणणे मांडले आहे. स्त्रियांना एकत्र जमवून त्यांच्याशी 'डाकीण' या विषयावर चर्चा केली. काही 'डाकीण काढलेल्या' स्त्रियांची हत्या झाली, काही सतत संशयाच्या वातावरणात आपल्याच घरात राहतात, तर काहींना गावातून हाकलले जाते. या सर्व स्त्रियांचे म्हणणे, 'मी डाकीण नाही'. डाकीणीच्या कहाण्या या मनाला भिडणाऱ्या आहेत; परंतु लेखिकेचा उद्देश केवळ आपली सहानुभूती जागृत करण्यापर्यंत मर्यादित नाही. ही प्रथा आजच्या समाजात नेमकी कशी टिकून राहते, तिला टिकवून ठेवण्यात कुणा-कुणाचा सहभाग आहे, याचा शोध घेत पत्रकार नरे-पवार पुढे जातात.

शेतात राबणारी, बाजारात वावरणारी, वेळ आली तर स्वत:च्या बळावर पीक काढू शकणारी आदिवासी स्त्री नेमकी कशी जगते... तिला समाजात कितपत स्वातंत्र्य आहे, याचा आढावा 'डाकीण वजा ती' या प्रकरणात घेतला आहे. मुळात तिला समाजात काही प्रमाणात स्वातंत्र्य नक्कीच आहे; पण तिला डाकीण काढल्यावर तिच्यावर फक्त घरातल्यांचीच नव्हे, तर संपूर्ण गावाची संशयी नजर रहाते. ती 'डाकीण' समजली जात नसली, तरी जास्त वाद घालणारी बाई- 'कर्कशा' म्हणून ओळखली जाते. 'डाकीण प्रथेचे पुजारी' या प्रकरणात 'भगत' या पात्राच्या भूमिकेची चर्चा केली आहे. कुणाचा मृत्यू, आजारपण, पिकाचा विनाश, आर्थिक नुकसान अशी कोणतीही अप्रिय घटना घडली की; त्याला डाकीण जबाबदार आहे, असे समजले जाते. मग एखाद्या घटनेला जबाबदार नेमकी कोणती स्त्री आहे? - डाकीण कोण? - हे शोधण्याचे काम भगताचे असते. शोधलेली बाई खरंच डाकीण आहे, हे सिद्ध करण्याचे व तिला शिक्षा जाहीर करण्याचे कामही भगताचे असते. या कामात भगत हा स्वत:भोवती वलय आणि प्रकरणाभोवती गूढ कसे निर्माण करतो, हे लेखिकेने दाखवले आहे. विचार करण्यासारखी बाब ही आहे की, भगताची गूढ विद्या त्याला समाजात मान व सत्ता मिळवून देते, तर डाकिणीकडे गूढ विद्या आहे या संशयामुळे तिला समाजाचा रोष सहन करावा लागतो. पुस्तकाच्या नंतरच्या प्रकरणात हा विरोधाभास उलगडण्याचा प्रयत्नही लेखिका करते.

डाकीण प्रथा ही अवैधानिक आहे आणि तिच्यामुळे स्त्रियांवर अन्याय होतो, हे आपल्या आधुनिक समाजाला मान्य असले; तरी तिला आळा घालण्याला कोणीच कसे यशस्वी ठरत नाही? पत्रकार नरे-पवार या प्रश्नाचा आता मागोवा घेतात. पोलीस यंत्रणा, निवडून आलेले (बऱ्याचदा आदिवासी समाजातले) राजकीय नेते, एनजीओ किंवा स्वयंसेवी संस्था आणि जनसंघटना यांनी डाकीण प्रथेवर नियंत्रण आणण्यासाठी काय केले आहे, हे माहीत करून घेण्यासाठी त्या या सर्व क्षेत्रांतील व्यक्तींच्या भेटी घेतात. या सर्व शोधातून एक मुद्दा पुन:पुन्हा समोर येतो. जेव्हा एखादी प्रथा समाजात प्रचलित असते- जेव्हा तिला परंपरेचा, धर्माचा, चालीरीतींचा आणि लोकांच्या विश्वासाचा आधार असतो; तेव्हा शासनकर्ते, राजकारणी आणि 'समाजपरिवर्तनाचे' राजकारण करणारेसुद्धा त्यात ढवळाढवळ करायला धजत नाहीत. विशेषकरून ही प्रथा स्त्रियांशी निगडित असेल, तर सत्तेच्या राजकारणाच्या पुरुषप्रधान जगात तिला बदलण्याचा प्रयत्न कुणी करत नाही, तिच्यावर कायद्याचा जोर लावायला कुणी तयार होत नाही. डाकीण प्रथेला बंदी घालणारा कायदा

पुस्तकाच्या पूर्वार्धात
'शोधात्मक पत्रकारितेचे'
(Investgative Journalism)
एक उत्तम उदाहरण आपल्याला पाहायला
मिळते आणि त्यातून आदिवासी समाजातील
डाकीण प्रथेचे एक वास्तविक चित्र
आपल्यासमोर उभे राहते- एवढेच नव्हे,
तर त्यावर कोणते उपाय करता येतील,
याची दिशाही सूचित होते;
परंतु या पुस्तकाचे मोल आणखी वाढते
ते लेखिकेने उत्तरार्धात घेतलेल्या
संशोधनात्मक वळणामुळे.

करण्यासही आदिवासी समाजातील आमदारांची मान्यता नसते; परंतु सत्तेच्या पदावर असलेल्या एखाद्या व्यक्तीने कृती करण्याचा निश्चय केला, तर काही बदल होऊ शकतो. लेखिका आपल्याला सांगतात की, झारखंड राज्यात डाकीण प्रथेला बंदी घालणारा कायदा आला आहे. पोलीस किंवा जनसंघटना त्याचा आधार घेऊ शकतात. एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने कारवाई करायचे ठरवले, तर एखाद्या स्त्रीला 'डाकीण' ठरवून तिच्यातील 'डाकीण काढण्यासाठी' तिच्यावर हिंसा करणाऱ्यांना शिक्षा होते, झाली आहे.

पुस्तकाच्या पूर्वार्धात 'शोधात्मक पत्रकारितेचे' (Investgative Journalism) एक उत्तम उदाहरण आपल्याला पाहायला मिळते आणि त्यातून आदिवासी समाजातील डाकीण प्रथेचे एक वास्तविक चित्र आपल्यासमोर उभे राहते- एवढेच नव्हे, तर त्यावर कोणते उपाय करता येतील, याची दिशाही सूचित होते; परंतु या पुस्तकाचे मोल आणखी वाढते ते लेखिकेने उत्तरार्धात घेतलेल्या संशोधनात्मक वळणामुळे.

डाकीण प्रथा ही आदिवासी समाजात आजही का टिकून आहे, हा प्रश्न एका पत्रकाराच्या शोधाचा ठरू शकतो. पण ही प्रथा आजची नाही- ती आदिम काळापासून या समाजात अस्तित्वात आहे. मग आदिवासींच्या श्रद्धा म्हणजे केवळ एका 'मागासलेल्या' जमातीची अंश्रद्धा नसून, त्यांचे निसर्गाशी असलेले नाते, त्यांच्या शेतीविषयीचे, वनस्पतीविषयीचे ज्ञान व अज्ञान, त्यांचे आपापसातले व स्त्री-पुरुषांमधले संबंध, त्यांची नीतिमत्ता- या सर्वांना आकार देणारी एक विचारप्रणाली आहे. डाकीण प्रथा हा एका विचारविश्वाचा भाग आहे. मग या विचारविश्वाचा इतिहास आपल्याला पाहायला हवा. लेखिका इथे संशोधक बनतात आणि त्या मानववंशशास्त्रातील अनेक तज्ज्ञांच्या म्हणण्याचा आढावा घेतात. भारतात आणि जगात इतरत्रही, आदिम समाजात स्त्रीची प्रजननशक्ती व भूमीची सुपीकता यांना गूढ समजले जाते आणि स्त्रियांच्या या शक्तीबद्दल भयही वाटते. तसेच स्त्रियांनी शेतीचा शोध लावला आणि धान्याचे वाटप करण्याची जबाबदारीही या मातृप्रधान समाजात स्त्रियांकडे होती. यातून पुरुषप्रधान समाज जेव्हा निर्माण होतो; तेव्हा स्त्रियांची गूढ शक्ती, त्यांचे ज्ञान आणि त्यांची सत्ता या सर्वांवर हमला होतो. देवीप्रसाद चट्टोपाध्याय ते शरद पाटील, रा. चिं. ढेरेंसारख्या विद्वानांचे विचार सांगून, नरे-पवार शेवटी- 'चेटकीण', 'विच' आणि तत्सम स्त्रियांविषयी लिहिणाऱ्या पाश्चात्त्य स्त्रीवाद्यांकडे वळतात. पश्चिम बंगालमधील आदिवासींवर काम करणाऱ्या महाश्वेतादेवींचा त्या अनेकदा उल्लेख करतात. स्त्रियांची विद्या, निसर्गाविषयी व मानवी नात्यांविषयीची स्त्रियांची समज यांची जोपर्यंत जगात पुरेशी दखल घेतली जात नाही; तोपर्यंत 'होय, मी डाकीण आहे' असे ठामपणे सांगणाऱ्या स्त्रियाही असतील, असे त्या पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणात आपल्याला सांगतात.

एकंदरीत, हे पुस्तक वाचून चिंतन करण्यासारखे आहे. संध्या नरे-पवार यांचे इतरही लेखन महत्त्वाचे आहे. 'तिची भाकरी कोणी चोरली?' या पुस्तकातून त्या महाराष्ट्रातील 'बहुजन' जातींतील स्त्रियांचे विश्व तपासतात. पत्रकाराची ऊर्जा आणि प्रश्नांचा मागोवा घेण्याची कला त्यांच्या अंगात आहेच. भारतातील स्त्रीवादी संशोधनात बहुमोल योगदान देणाऱ्या त्या एक चांगल्या अभ्यासक आणि सामाजिक बांधिलकी असलेल्या सृजनशील लेखिका आहेत.

**– वंदना सोनाळकर**

Mob.: 9423781196

साहित्य : **अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार**

# प्लॅटफॉर्म नंबर झीरो : अमिता नायडू



माझे हे छोटे दोस्त त्यांच्या आयुष्यात ज्या प्रकारे संघर्ष करतात ते बघितल्यामुळेच मला माझ्या स्वतःच्या आयुष्यात कधीही रिकामं, हताश, उदास वाटलं नाही. घरातून पळून प्लॅटफॉर्मवर येणाऱ्या या मुलांनी आपापल्या भागात सर्व प्रकारच्या अस्थिरतेला तोंड दिलेलं असतं. चांगल्या भविष्याच्या आशेने किंवा कधीकधी आहे त्या परिस्थितीतून सुटका म्हणून त्यांना सहज शक्य असणारा हा मार्ग त्यांनी निवडलेला असतो. ही मुलं जेव्हा पळून स्टँडवर, स्टेशनवर आसरा घेतात तेव्हा त्यांना इथे आणायला कोण जबाबदार आहे याचा विचार आपण करणार आहोत की नाही, हा खरं म्हणजे यातला विचार करण्याचा भाग आहे.

## मनोगत

# ‘प्लॅटफॉर्म नं झीरो’ बनताना, बनल्यानंतर...

पुस्तकातला प्लॅटफॉर्म महाराष्ट्रातल्या कोणत्याही मोठ्या शहरातला जसा असू शकतो, तसाच तो देशातल्याही कोणत्याही मोठ्या शहरातला असू शकतो. सगळीकडच्या प्लॅटफॉर्मवरच्या सगळ्या मुलांचं थोड्याफार फरकाने असंच आयुष्य असतं. पुस्तकाचं नावही म्हणूनच ‘प्लॅटफॉर्म नं. झीरो’ आहे. हे अत्यंत समर्पक नाव सुचलं, माझे प्रकाशक मित्र सुहास कुलकर्णी यांना.

हे पुस्तक आहे ॲन्थनी, बिल्लू, मुन्ना, झहीर, राणा, किशोर, जग्गू अशा छोट्या मुलांचं. कोण आहेत ही मुलं? ही मुलं आहेत ‘स्टेशन किंवा प्लॅटफॉर्मवर राहणारी मुलं!’

या सगळ्या मुलांशी माझी भेट झाली २००४ च्या सुमाराला, ‘स्पॅरो’ नावाच्या एका संस्थेच्या माध्यमातून! ही संस्था माझी मैत्रीण सुदेष्णा घारे हिची. तिने या आधी खूप वर्ष या मुलांसाठी काम केलं होतं. मधल्या काळात लग्न आणि त्यामुळे आलेल्या जबाबदारीने काही काळ ती स्टेशनपासून आणि या मुलांपासून लांब होती. थोडं स्थिरस्थावर झाल्यावर पुन्हा काम करायचं ठरलं आणि अशा मुलांसाठी काम करण्याची माझी ओढ माहीत असल्यानेच तिने मला पण विचारलं. पत्रकारितेला ‘बाय, बाय’ करून २००२ पासून सामाजिक क्षेत्रात काम करायचं मी ठरवलं होतं ते ‘प्रश्नांना आपणच उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करायचा’ या प्रामाणिक तळमळीतून. या तळमळीचा केंद्रबिंदू होती, विकासापासून दूर असलेली, मुख्य प्रवाहात अनेक कारणांनी येऊ न शकणारी मुलं! त्यामुळे या संधीचा मी लगेच फायदा घेतला.

त्या वेळेस अजूनही काही संस्था या मुलांसाठी वेगवेगळ्या प्रकारची कामं करत होत्या. महानगरपालिकेनेही काही स्थानिक उद्योजकांच्या सहकार्याने या मुलांसाठी काम करायचे ठरवले होते, तेव्हा मग जे काम त्या करतात तेच न करता आम्ही वेगळं काही करायचं ठरवलं. मी रोज स्टेशनवर जाऊन मुलांशी गप्पा मारायच्या (म्हणजे खरं तर त्यांना बोलतं करायचं आणि मी फक्त ऐकायचं) असं ठरलं आणि मग त्याप्रमाणे माझी रोजची स्टेशनवारी सुरू झाली.

हे काम वाटलं तसं सोपं नव्हतं. कारण मुलांना त्यांच्या, त्यांच्या आवडी, निवडी, त्यांच्या इच्छा होत्या. जी मुलं कामधंदा करून पैसे कमवत होती, त्यांना कोणता वेळ मोकळा मिळेल हे बघायला लागणार होतं. जी मुलं काम करत नव्हती त्यांच्यापाशी पण त्यांचा वेळ घालवण्याचं प्लॅनिंग तयार असायचं. मला वाटलं म्हणून मी माझ्या सोयीच्या वेळेला जाऊन त्यांना बोलतं करायचं काम करू शकत नव्हते. त्यांनाही माझ्याशी बोलावं असं वाटायला हवं होतं. मुलं एकदम माझ्याशी बोलली नसती हे मला माहीत होतं आणि त्याबाबत कोणत्याही फिल्मी, अवास्तव, भ्रामक कल्पना माझ्या डोक्यात अजिबात नव्हत्या. सुरुवातीला रोज जाऊन सगळ्या प्लॅटफॉर्मवर हिंडायचं, भेटतील त्या मुलांची हालहवाल विचारायची, त्यांचा दिनक्रम माहीत करून घ्यायचा असं मी ठरवलं.

हे रूटीन चांगलं बसलं. रोज गेल्याने मुलांना माझ्या

असण्याची सवय व्हायला लागली. हळूहळू त्यांच्याकडूनही 'कैसे हो दीदी?' यासारखा किंवा एखाद्या दिवशी गेले नसेल तर 'दीदी, कल दिखे नई...' यांसारखा प्रतिसाद मिळायला लागला. गप्पा मात्र होत नव्हत्या. एवढे दिवस येतेय म्हटल्यानंतर मुलं नेहमीपेक्षा जास्त वेळ जवळ बसायची. वरवरच्या चेष्टा-मस्करी व्हायच्या. पण थोडं बोलतं करण्याच्या हेतूने जरा जास्त खोलात जायचा प्रयत्न केला की मुलं, 'अच्छा, दीदी थोडा कामए' म्हणून सटकायची. बऱ्याचदा मी एखादं गोष्टीचं पुस्तक, स्केच बुक किंवा चित्रं काढायचं साहित्य घेऊन जायची. मुलं दुपारच्या वेळेत ज्या कोपऱ्यात जेवायला, खेळायला किंवा झोपायला जमायची, तिथे जाऊन त्यांची परवानगी घेऊन मी तिथे बसायची आणि मग त्यांच्या गप्पांना किंवा झोपेला डिस्टर्ब न करता, कधी पुस्तक उघडून वाचत बसे, कुठे स्केचच काढ असं करायची. कधी कोणत्या मुलाने मी करत असलेल्या गोष्टीत रस दाखवला तर त्याला त्यात सहभागी करून घ्यायची. मुलांना बहुदा विश्वास वाटायला सुरूवात झाली असावी कारण नंतर मुलं माझी वाट बघायला लागली. एका प्रसंगानंतर आमच्यातलं जे काही थोडंफार अंतर होतं तेही संपलं आणि माझं व मुलांचं एक घट्ट नातं तयार झालं. मला एकदमच त्यांच्या आतल्या गोटात प्रवेश मिळाला. यानंतर मात्र माझं काम खऱ्या अर्थाने सुरू झालं. मुलं मोकळेपणाने माझ्याशी बोलू लागली आणि मग त्यांचं जग माझ्यापुढे खुलं व्हायला लागलं.

माझे हे छोटे दोस्त त्यांच्या आयुष्यात ज्या प्रकारे संघर्ष करतात ते बघितल्यामुळेच मला माझ्या स्वतःच्या आयुष्यात कधीही रिकामं, हताश, उदास वाटलं नाही. घरातून पळून प्लॅटफॉर्मवर येणाऱ्या या मुलांनी आपापल्या भागात सर्व प्रकारच्या अस्थिरतेला तोंड दिलेलं असतं. चांगल्या भविष्याच्या आशेने किंवा कधीकधी आहे त्या परिस्थितीतून सुटका म्हणून त्यांना सहज शक्य असणारा हा मार्ग त्यांनी निवडलेला असतो. ही मुलं जेव्हा पळून स्टँडवर, स्टेशनवर आसरा घेतात तेव्हा त्यांना इथे आणायला कोण जबाबदार आहे याचा विचार आपण करणार आहोत की नाही, हा खरं म्हणजे यातला विचार करण्याचा भाग आहे.

या मुलांभोवतालचे धोके कमी करून त्यांनाही सक्षम करून त्यांचाही सहभाग घेणं हाच एक सकारात्मक भाग वाढवण्याची गरज आहे. त्यांचा विधायक रीतीने कसा उपयोग करून घेता येईल हे संवेदनशीलतेने आणि सर्जनशीलतेने बघायला हवं. त्यांच्या क्षमता तपासायला हव्यात. थोडी मेहनत घेतली तर या मुलांच्यात असलेल्या ऊर्जेचा योग्य तो उपयोग करून घेता येण्यासारखा आहे. पण हे सगळं करायचं असेल तर आधी या मुलांचं जगणं, त्यांचा भोवताल संवेदनशीलतेने, कोणतेही पूर्वग्रह मनात न ठेवता समजून घेण्याची गरज आहे. हे पुस्तक त्याच भूमिकेतून लिहिलं गेलं आहे.

पुस्तक लिहिताना ही मुलं आणि त्यांचं जगणं हाच मुख्य केंद्रबिंदू असल्यानं यात संस्थेचं काम अर्थातच पार्श्वभूमीवर आहे. प्रत्येक मुलाचं स्वतंत्र व्यक्तीचित्रण करावं असं प्रकाशनसंस्थेच्या संपादकीय चर्चेत ठरलं आणि मग पुस्तक त्याच अंगाने लिहिलं गेलं. एका विशिष्ट काळातला एका मुलाचा प्रवास त्यात आहे. तसंच त्या अनुषंगाने येणारी इतरही मुलं आहेत.

पुस्तकातला प्लॅटफॉर्म महाराष्ट्रातल्या कोणत्याही मोठ्या शहरातला जसा असू शकतो तसाच तो देशातल्याही कोणत्याही मोठ्या शहरातला असू शकतो. सगळीकडच्या प्लॅटफॉर्मवरच्या सगळ्या मुलांचं थोड्याफार फरकाने असंच आयुष्य असतं. पुस्तकाचं नावही म्हणूनच 'प्लॅटफॉर्म नं. झीरो' आहे. हे अत्यंत समर्पक नाव सुचलं, माझे प्रकाशक मित्र सुहास कुलकर्णी यांना.

काही वर्षं हे काम केल्यानंतर आज जरी मी या मुलांबरोबर प्रत्यक्ष नसले तरी या पुस्तकाच्या निर्मितीच्या निमित्ताने मी पुन्हा ते दिवस, ते क्षण अनुभवले, जगले आणि एक उदास आनंदही मिळाला. पुस्तक पूर्ण झालं तेव्हा माझ्या छोट्या दोस्तांसाठी मी काहीतरी करू शकले हा आनंद होता आणि आज आम्ही एकमेकांच्या आयुष्यातला महत्त्वाचा भाग असूनही एकमेकांजवळ नाही आहोत ही उदासीही होती. हे पुस्तक वाचून लोकांनी माझ्या या छोट्या दोस्तांना आणि त्यांच्यासारखंच आयुष्य जगणाऱ्या इतर मुलांनाही स्वतःच्या घराच्या, मनाच्या भिंती थोड्या वाढवून जागा करून दिली तरी माझ्या या लिखाणाने आपलं काम केलं असं मी म्हणेन.

**अमिता नायडू**
Mob.: 9922410951

ओळख
## अमिता नायडू

# दीनवाणं आणि उघडवागडं जगणं

## सुहास कुलकर्णी

अमिता नायडू यांच्या 'प्लॅटफॉर्म नंबर झीरो' या पुस्तकाशी माझा किमान तिहेरी संबंध आहे. एक– या पुस्तकाचा मी प्रकाशक आहे. दोन– या पुस्तकाचा मी संपादक आहे. तीन– लेखिकेचा मी किमान पंचवीस वर्षांपासूनचा मित्र आहे. त्यामुळे यांतील कोणत्या भूमिकेत शिरून या पुस्तकाबद्दल आणि त्याच्या लेखिकेबद्दल लिहावं, अशा संभ्रमात मी आहे. त्यामुळे या तीनही भूमिकांत एकदमच शिरून लिहिण्याचा पर्याय मी इथे निवडतो आहे. कारण हे पुस्तक आज ज्या स्वरूपात वाचकांसमोर आहे, त्याला या तीनही भूमिका कारणीभूत आहेत.

कसं, ते सांगतो.

अमिता आणि मी कॉलेजपासूनचे मित्र. दोघांचीही कॉलेजेस वेगवेगळी, पण पत्रकारिता करण्याच्या वेडाने पछाडलेलो असल्याने कुठून तरी एकत्र भेटलेलो. काही काळ एका ठिकाणी एकत्र कामही केलं. ते दिवस ऐन तारुण्यातले, त्यामुळे 'हे करायला पाहिजे' आणि 'ते करायला पाहिजे'– अशा गप्पांनी भारलेले. पुढे मी 'किर्लोस्कर' मासिकांमध्ये रुजू झालो तरी आमच्यातील मैत्र कायम राहिलं. पुढे तीनच वर्षांनी मी माझ्या सहकाऱ्यांसह 'युनिक फीचर्स' ही समांतर पत्रकारिता करू इच्छिणारी माध्यम संस्था काढली आणि पाठोपाठ अमिता तिथे रुजू झाली.

एकीकडे नानाविध विषयांवर लिखाण चाललेलं असताना तिच्या डोक्यात लहान मुलांचा विचार सतत चालू असे. त्यामुळे ती मुलांसाठी लिही, मुलांच्या प्रश्नांसंबंधी लिही. वंचित मुलांच्या प्रश्नांबद्दल तिला सुरुवातीपासूनच ओढा फार. पण हा ओढा तिला स्वस्थ बसू देईना, तेव्हा तिने पत्रकारितेला 'बाय–बाय' करायचं ठरवलं. 'प्रश्नांवर फक्त लिहून काय उपयोग होणार आहे? प्रश्नांवर आपणच उत्तरं शोधायला पाहिजेत,' अशा निष्कर्षापर्यंत ती आली आणि तिने सामाजिक कार्यात शिरायचं ठरवलं. निराधार स्त्रियांच्या आधारगृहाची आधी सुपरिटेंडेंट आणि नंतर प्रमुख अशी जबाबदारी तिने तीन–चार वर्षं पार पाडली. हे काम करत असतानाच तिने स्टेशनवर बेवारस आयुष्य जगणाऱ्या मुलांमध्ये वेळ घालवायला सुरुवात केली. 'स्पॅरो' या संस्थेमार्फत ती तिथे जाऊ लागली, मुलांशी बोलू लागली आणि त्यांना विविध कामात मदत करू लागली. तिचं हे काम सहाएक वर्षं चाललं होतं. या काळात (आणि कामात) अमिता बदलली, तिचं व्यक्तिमत्त्व बदललं, समज बदलली. ती मुळातच बेधडक स्वभावाची. जबरदस्त आत्मविश्वास बाळगून असलेली. पण स्टेशनवरच्या मुलांच्या सहवासाने ती आणखी निडर बनली. तिचं हे बदलणं मी बघत होतो. तिच्याशी बोलत होतो.

पुढे कुठल्या तरी कारणाने अमिताचं ते काम थांबलं. मग ती मुलांच्याच अन्य प्रश्नांवर काम करू लागली. दरम्यान, 'युनिक फीचर्स'ने प्रकाशनविश्वात पाऊल टाकलं होतं. मराठीत जी पुस्तकं सहजी निघत नाहीत ती पुस्तकं आपण काढायची, असा त्यामागचा विचार होता. 'युनिक फीचर्स'ची शोधक वृत्ती पुस्तक प्रकाशनातही रुजवता येईल का, असा प्रयत्न त्यामागे होता. मला अमिताचं मुलांमधलं काम आतून–बाहेरून माहीत होतं. त्यामुळे स्टेशनवरील मुलांमध्ये घालवलेल्या त्या दिवसांबद्दल, त्या मुलांच्या जगण्याबद्दल तिने लिहावं, असं मी तिला म्हटलं. आधी तिला ते पटत नव्हतं. मी आता ते काम थांबवलंय, माझा त्या मुलांशी आता संपर्क उरलेला नाही, असा नकारात्मक सूर तिने काढला. पण तिने आयुष्याची जी सहा वर्षं त्या मुलांसाठी दिली होती, ती वाया जाऊ नयेत, असं तिचा मित्र म्हणून माझं म्हणणं होतं. दुसरीकडे, तिने पुस्तक लिहिलं तर भारतभरातील स्टेशनच्या आडोशाने राहणाऱ्या लाखो मुलांचं जगणं प्रातिनिधिक रूपात का होईना, प्रकाशात येईल, असं पत्रकार–संपादक या नात्याने मला जाणवत होतं. तिसरीकडे, या पुस्तकामार्फत एक अस्पर्शित विषय आपण वाचकांसमोर आणू शकू, असं प्रकाशक या नात्याने वाटत होतं.

अखेरीस अमिताने पुस्तक लिहायचं ठरवलं; आणि

चर्चा-दुरुस्त्या-बदलाबदली-संपादन या सर्व प्रक्रियांतून जाऊन वाचकाला हादरवून टाकणारं, त्याचं अनुभवविश्व विस्तारणारं अन् एका दुर्लक्षित प्रश्नाकडे भेदकपणे लक्ष वेधणारं 'प्लॅटफॉर्म नंबर झीरो' हे पुस्तक तयार झालं. मराठीतलं या प्रकारचं हे एकमेव पुस्तक असावं.

आपल्याकडे कथा, कादंबरी, कविता, ललित, वैचारिक आणि समीक्षात्मक वगैरे प्रकारच्या लेखनाचा बराच विकास झाला आहे. मात्र समाजात घुसून, समकालीन प्रश्नांना भिडून वाचकांना खडबडून जागं करण्याचा प्रवाह पुरेसा विस्तारलेला नाही. अनिल अवचट, निळू दामले वगैरे मंडळींनी असं खणखणीत लेखन केलं आहे. आम्हीही 'युनिक फीचर्स'मधील मित्रांनी मिळून 'अर्धी मुंबई' हे त्यांच्या परंपरेतील पुस्तक लिहिलं आहे. अमिताचं 'प्लॅटफॉर्म नंबर झीरो' हेही त्याच परंपरेतलं. अवचटांनी दीर्घ काळ जे पत्रकारी रिपोर्ताज शैलीतलं लेखन केलं, त्यापेक्षा अमिताचं लेखन वेगळं असलं; तरी हा प्रवाह पुढे नेणारं अमिताचं हे पुस्तक आहे. पत्रकारांच्या येणाऱ्या पिढ्यांना या पुस्तकातून समकालीन विषयांवर लिहिण्याची प्रेरणा मिळावी!

अमिताच्या या पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य सांगायलाच हवं. एरवी लेखकाला एखादा विषय सुचतो आणि मग तो त्या विषयाचा माग वगैरे काढायला लागतो. बऱ्याचदा जेवढी माहिती हवी होती तेवढी मिळाली असं वाटलं की, लेखक थांबतो आणि लिहिता होतो. या प्रक्रियेत लेखकाची समज, त्याची दृष्टी, त्याचा दमसास यावर पुस्तकाची खोली ठरते. विषयाचा आवाका पुस्तकात किती प्रतिबिंबित होणार, हेही ठरतं. अनेकदा विषय वाचायलाच हवा असा असतो, पण ते पुस्तक वाचून वाचकाचं समाधान होतंच असं नाही. अमिताच्या पुस्तकाबाबत असं होत नाही. कारण अमुक एका विषयावर पुस्तक लिहायला हवं, या 'लेखकीय' गरजेतून हे पुस्तक लिहिलं गेलेलं नाही. आपल्या 'आतल्या आवाजा'ला स्मरून अमिताने स्टेशनवरील मुलांमध्ये सहा वर्षं घालवली, तेव्हा त्यामागचा हेतू पुस्तक लिहिणे हा नव्हता. आपण जे सर्व अनुभवतो आहोत ते पुस्तकात लिहायचं आहे, याची कोणतीही जाणीव तेव्हा अमितामध्ये नव्हती. त्यामुळे 'माहिती मिळाली, चला लिहून टाकू या' या दृष्टिकोनाची मर्यादा तिला पडण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळेच हे पुस्तक वाचताना आपण एक धगधगीत वास्तव अनुभवत आहोत याची जाणीव होत राहते. वाचकाला अस्वस्थ करून सोडते. अमितामधील सामाजिक कार्यकर्तीची कळकळ आणि पत्रकारातील सहज-सोपी चित्रमय शैली यांच्या मिलाफामुळे हे पुस्तक वाचकाच्या डोक्यात जसं घुसतंच!

हे पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर तिला (व प्रकाशक या नात्याने आम्हाला) वाचकांकडून जो प्रतिसाद मिळाला, त्यात याच अनुभवाचं प्रतिबिंब पडलेलं दिसलं. 'आम्हाला या मुलांचं हे दीनवाणं आणि उघडंवाघडं जगणं माहीतच नव्हतं. आम्ही आमच्या जागेवर या मुलांसाठी काही करू शकू की नाही माहीत नाही, परंतु या मुलांबद्दलचा आमचा दूषित दृष्टिकोन या पुस्तकामुळे बदलला', असं वाचक कळवत होते.

एखाद्या पुस्तकामुळे आणखी किती तरंग उमटतात आपल्या थंड, शांत सामाजिक जगण्यामध्ये!

परंतु तरीही एक प्रश्न उपस्थित करावासा वाटतोच. पत्रकारितेला 'राम राम' करताना 'आपणच प्रश्नांवर उत्तरं शोधायचा प्रयत्न करायला हवा,' असं जे अमिता म्हणाली होती; त्याचं आज दहा वर्षांनंतर काय झालं? या काळात ती कधी या संस्थेसोबत, तर कधी त्या संस्थेसोबत काम करत राहिली. त्या कामाच्या अनुभवातून तिने हे पुस्तक लिहिलं. ती पुढेही लिहीत राहील; पण आपल्या पद्धतीने प्रश्न समजून घेणं आणि ते सोडवण्यासाठी प्रयत्न करणं यासाठी तिला मोकळ्या विचारांच्या एखाद्या संस्थेची गरज आहे. अशा संस्थेची साथ तिला अद्याप मिळालेली नाही.

अशी एखादी संस्था पुढे येईल का आणि आज विधिसंघर्षग्रस्त मुलांमध्ये काम करणाऱ्या अमिताला एखादा आश्वासक 'प्लॅटफॉर्म' मिळेल का, हा तो प्रश्न!

हल्ली ज्या रीतीने पुरस्कार अपसंस्कृती फोफावली आहे, ती पाहता, आपल्या पुस्तकाला पुरस्कार मिळू नये अशी मनोमन प्रार्थना करण्याचे आजचे दिवस आहेत. त्यामुळे अमिताच्या पुस्तकाला पुरस्कार मिळाल्याचं जेव्हा कळलं, तेव्हा अमिताला म्हटलं,

'नशीबवान आहेस तू! कोणताही अर्ज, विनंती न करता तुला पुरस्कार मिळाला. पुरस्काराचं सोड; पण या पुरस्कारामुळे तुझी पुढील वाट सुकर होईल कदाचित!'

**सुहास कुलकर्णी**
suhas.kulkarni@uniquefeatures.in